# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिकामार्ग, पत्रपेटीक्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी- २२६१७९६९, फॅक्स- २२६९०००७

E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


ईमेलद्वारे

क्रमांक :१८/तशिसं/डीबीटी-पोर्टल/वि.का/ SEBC /२०१९/४४३

दिनांक : ७/१०/२०१९

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय - **सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (SEBC) विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी लागू करणेबाबत.......**

संदर्भ - विमुक्तजाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग यांचे शासन निर्णय क्र.सीबीसी-२०१९/प्र.क्र.१०८/मावक, दि. ११ जुलै, २०१९.

सोबत जोडलेल्या संदर्भीय शासन निर्णयान्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (SEBC) विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना** लागू करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व संस्थांना सूचित करावे की, "संस्थेमध्ये शिकणाऱ्या एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून उपरोक्त योजनांतर्गत **सन २०१९-२०** साठी योजनेचे अर्ज **डी.बी.टी पोर्टलवर** (संकेतस्थळ : **http://mahadbtmahait.gov.in**) तात्काळ ऑनलाईनरित्या भरुन घ्यावे व संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी प्रलंबित न ठेवता अर्ज निकाली काढावे.( याबाबत काही तांत्रिक अडचण असल्यास **डी.बी.टी पोर्टलवर** उपलब्ध Grievance /Suggestions द्वारे कळवावे.) व संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी प्रलंबित न ठेवता अर्ज निकाली काढावे. तसेच एसईबीसी प्रवर्गातील कोणताही पात्र विद्यार्थी उपरोक्त योजनेसाठी अर्ज भरण्यापासून वंचित राहाणार नाही याची दक्षता स्वत: संस्थेच्या प्राचार्यांनी घ्यावी अन्यथा अर्ज न भरण्याच्या कारणास्तव किंवा संस्थांनी प्राप्त अर्ज निकाली न काढल्याच्या कारणास्तव पात्र एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहील."

तसेच, विभागीय कार्यालयांनीदेखील संस्थेने पाठविलेल्या अर्जांची छाननी प्रलंबित न ठेवता निकाली काढावी आणि याबाबतची दक्षता सहसंचालक यांनी स्वत: घ्यावी.

(डॉ. अभय वाघ.)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/SEBC/2019/ 3032

दिनांक :- 9 OCT 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय तंत्रनिकेतन, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था, नागपूर विभाग, नागपूर.

**आपणांस कळविण्यांत येते की, सदर प्रत्रात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.**

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.